दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी... epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४७८ वा ● बुधवार, ता. २४ डिसेंबर २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००


## राष्ट्रवादी एकत्र येणार? औपचारिक प्रस्ताव नाही

### निर्णय लोकशाही प्रक्रियेतूनच- सुप्रिया सुळे



**पुणे । रयत समाचार**

नगर परिषद निवडणुकांमध्ये भाजपसह महायुतीला मोठे यश मिळाल्यानंतर राज्याच्या राजकारणात नव्या घडामोडींना वेग आला आहे. विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र येणार का, याबाबत जोरदार चर्चा सुरू झाल्या असून २६ डिसेंबर रोजी दोन्ही पक्ष एकत्र येतील, अशा चर्चांनाही उधाण आले होते. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) खासदार सुप्रिया सुळे यांनी या चर्चांवर आपली भूमिका स्पष्ट केली आहे. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, आघाड्या आणि युती कशा करायच्या याबाबत विविध पातळ्यांवर चर्चा सुरू असतात. मात्र ठोस प्रस्ताव समोर येत नाही, तोपर्यंत त्यावर बोलणे योग्य ठरणार नाही. आमचा पक्ष लोकशाही पद्धतीने चालतो. त्यामुळे पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी चर्चा करूनच निर्णय घेतले जातील. प्रशांत जगताप यांच्याशी माझी सविस्तर चर्चा झाली असून विविध पर्यायांवर विचार झाला आहे. मात्र माझ्याकडे कोणत्याही पक्षाचा औपचारिक प्रस्ताव आलेला नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. अजित पवार गटासोबत चर्चा सुरू असल्याच्या प्रश्नावर सुळे म्हणाल्या की, अजित पवार आणि आमच्या पक्षातील काही लोकांमध्ये चर्चा सुरू असू शकतात. अनेक वर्षांचे राजकीय व वैयक्तिक संबंध असल्याने संवाद होणे स्वाभाविक आहे. मात्र निर्णय हा कार्यकर्ते, पुणेकर आणि शहराच्या विकासाला केंद्रस्थानी ठेवूनच घेतला जाईल, असे त्यांनी नमूद केले. महाविकास आघाडीबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, मुंबईत उद्धव ठाकरे यांच्या पक्षाशी चर्चा सुरू आहे. महाविकास आघाडीचे जागावाटप अंतिम टप्प्यात असून आम्ही एकत्र लढावे, अशी आमची भूमिका आहे. अजित पवार यांच्या वक्तव्यांबाबत सुळे म्हणाल्या की, त्यांनी काय वक्तव्य केले आहे, याची मला माहिती नाही. माझ्याशी याबाबत कोणतीही चर्चा झालेली नाही. शरद पवार सध्या बारामतीला असून त्यांच्याशीही यासंदर्भात बोलणे झालेले नाही. प्रशांत जगताप यांनी राजीनामा दिल्याच्या बातम्या चुकीच्या असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. ठाकरे बंधूंच्या संभाव्य युतीवर प्रतिक्रिया देताना सुळे म्हणाल्या की, संजय राऊत यांनी व्यक्त केलेली भूमिका त्यांच्या मनाचा मोठेपणा दर्शवते. ठाकरे बंधू एकत्र येऊन लढले, तर ती बाळासाहेब ठाकरे यांना दिलेली सर्वात मोठी आदरांजली ठरेल, असे मतही त्यांनी व्यक्त केले.




## माणुसकीचा खरा अर्थ दाखवणारी घटना

### बेवारस मातेला पोलीसदादांनी दिला अखेरचा सलाम

**गडचिरोली । रयत समाचार**

पोलीस म्हणजे केवळ कायद्याची अंमलबजावणी करणारा अधिकारी नसून तोही एक संवेदनशील माणूस असतो, याची प्रचिती देणारी हृदयस्पर्शी घटना गडचिरोलीत घडली. आठ दिवसांपूर्वी रात्री उशिरा गडचिरोली पोलीस ठाणे येथे एक फोन आला. गडचिरोली बसस्थानकात एक वृद्ध महिला अत्यंत अशक्त अवस्थेत पडून असल्याची माहिती मिळताच पुर्वी अहमदनगर एमआयडीसी येथे कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक विनोद चव्हाण यांनी क्षणाचाही विलंब न करता आपल्या पथकासह घटनास्थळी धाव घेतली. परिस्थिती गंभीर असल्याने त्या वृद्ध महिलेला तात्काळ जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार सुरू असतानाच पोलीस प्रशासनाकडून तिच्या नातेवाईकांचा शोध घेण्यात आला. मात्र अनेकांनी थेट ''आम्ही तिला ओळखत नाही'' असे सांगत जबाबदारी झटकली. जन्म देणाऱ्या आईला बेवारस सोडण्याची ही विदारक मानसिकता पाहून उपस्थितांचे मन सुन्न झाले. वृद्ध महिला अतिशय अशक्त असल्याने वृद्धाश्रम किंवा सामाजिक संस्था तिला स्वीकारण्यास तयार नव्हत्या. अखेर पोलीस निरीक्षक विनोद चव्हाण यांनी जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर व नर्सिंग स्टाफला तिची विशेष काळजी घेण्याची विनंती केली. चारपाच दिवस उपचार सुरू असतानाच त्या मातेला मृत्यूने गाठले. मृत्यूची माहिती नातेवाईकांना देण्यात आली; मात्र प्रतिसाद अधिकच वेदनादायक होता''आम्ही येणार नाही, तुम्हीच पाहून घ्या.'' ना नातं, ना आधार अखेर पुढे आले ते पोलीस आणि नगरपालिकेचे कर्मचारी. कर्तव्य आणि माणुसकी यांची सुंदर सांगड घालत, पोलीस दादा आणि गडचिरोली नगरपरिषद कर्मचाऱ्यांनी त्या अनोळखी मातेला अखेरचा खांदा दिला. सन्मानाने अंतिम संस्कार करण्यात आले. त्या क्षणी अनेकांच्या डोळ्यांत अश्रू होते. या माणुसकीच्या कार्यात पोलीस योगेश कोरवते, अजय कोल्हे, नगरपरिषद मुख्याधिकारी सूर्यकांत पीदुरकर, वैभव कागदेलवार (आरोग्य विभाग), राजू मधुमटके, स्वप्निल निमगडे (स्वच्छता विभाग), मोरेश्वर मडावी, किशोर पोहनकर, किशोर मुनघाटे, सुखीराम मेश्राम, लोमेश देशमुख यांचा सहभाग होता. ही केवळ एक घटना नाही, तर समाजाला आरसा दाखवणारी जाणीव आहे. पोलीस म्हणजे माणूसच आणि कधी कधी तोच माणुसकीचा अखेरचा आधार ठरतो, अशी प्रतिक्रिया तुषार वांढेकर यांनी दिली आहे.




### आदिवासी हक्क धोक्यात?

## ग्रेट निकोबार मेगा प्रकल्पावर पुन्हा आक्षेप

**नवी दिल्ली । रयत समाचार**

ग्रेट निकोबार मेगा प्रकल्पामुळे आदिवासी जमीन, वनहक्क आणि विशेषतः अत्यंत असुरक्षित शॉम्पेन (Shompen) जनजातीवर होणाऱ्या परिणामांबाबत आदिवासी परिषदेने पुन्हा एकदा राष्ट्रीय अनुसूचित जनजाति आयोगाकडे हस्तक्षेपाची मागणी केली. यापूर्वी मांडलेल्या आक्षेपांवर अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप परिषदेने केला. परिषदेच्या म्हणण्यानुसार, प्रस्तावित प्रकल्पामुळे आदिवासींच्या पारंपरिक उपजीविकेवर, निवासस्थानांवर आणि वनसंपत्तीवरील अधिकारांवर गंभीर परिणाम होऊ शकतो. विशेषतः शॉम्पेन जनजाति ही अत्यंत कमी लोकसंख्येची आणि संवेदनशील असल्याने त्यांच्या अस्तित्वालाच धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. वनहक्क कायदा, आदिवासी सल्लामसलत प्रक्रिया आणि पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन यांचे काटेकोर पालन न होता प्रकल्प पुढे नेला जात असल्याचा दावा परिषदेने केला आहे. त्यामुळे या सर्व मुद्द्यांवर तातडीने दखल घेऊन स्वतंत्र चौकशी, स्थानिक आदिवासींशी थेट संवाद आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण सुनिश्चित करण्याची मागणी आयोगाकडे करण्यात आली. पर्यावरणीय समतोल आणि विकास यामध्ये समन्वय साधत आदिवासी हक्कांना प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे मतही परिषदेने व्यक्त केले.

## प्रसिद्ध अभिनेते सचिन आज बेळगावात

### बी.के. मॉडेल हायस्कूल शताब्दी महोत्सव कार्यक्रम



**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

प्रतिष्ठित शिक्षण संस्था बेळगाव एज्युकेशन सोसायटीच्या बी.के. मॉडेल हायस्कूलच्या शताब्दी महोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचला. या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणून बुधवार, ता. २४ डिसेंबर रोजी भारतीय सिनेसृष्टीतील दिग्गज अभिनेते व दिग्दर्शक सचिन पिळगावकर उपस्थित राहणार आहेत. शाळेच्या भव्य मैदानावर सायंकाळी ५.३० वाजता हा कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमात सचिन पिळगावकर विद्यार्थ्यांशी व उपस्थितांशी संवाद साधणार असून चित्रपट दिग्दर्शन, सिनेसृष्टीतील करिअरच्या विविध संधी तसेच मराठी चित्रपटसृष्टीतील गेल्या काही वर्षांतील लक्षणीय प्रगती या विषयांवर ते आपले विचार मांडणार आहेत. बी.के. मॉडेल हायस्कूल स्थापनेला १०० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आयोजित सात दिवसीय महोत्सवात अनेक नामवंत व्यक्ती उपस्थित राहिल्या. पिळगावकर यांच्यासारख्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना कला क्षेत्रातील नवी क्षितिजे खुली होतील, असा विश्वास शाळेच्या व्यवस्थापन समितीने व्यक्त केला आहे. या कार्यक्रमास बेळगाव शहरातील कलाप्रेमी नागरिक व माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे चेअरमन अविनाश पोतदार व सहकाऱ्यांनी केले. सचिन पिळगावकर यांनी वयाच्या चौथ्या वर्षापासून चित्रपटसृष्टीत प्रवेश केला असून त्यांनी अनेक चित्रपटांत बालकलाकार म्हणून काम केले. मराठीत नवरी मिळे नवऱ्याला, अशी ही बनवाबनवी, गंमत जंमत, एकापेक्षा एक, नवरा माझा नवसाचा, कट्यार काळजात घुसली हे त्यांचे गाजलेले चित्रपट आहेत. तसेच हिंदीत गीत गाता चल, अखियों के झरोखो से, नदिया के पार, शोले, सत्ते पे सत्ता या चित्रपटांतील त्यांच्या भूमिका विशेष गाजल्या आहेत. त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले असून अष्टविनायक व कट्यार काळजात घुसली या चित्रपटांसाठी सर्वोत्कृष्ट अभिनेता पुरस्कार मिळाला आहे. याशिवाय काही चित्रपटांच्या दिग्दर्शनासाठीही त्यांना विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

## पर्यावरणवादी लेखक मणिक पुरी यांना विदर्भ साहित्य संघाचा मानाचा पुरस्कार






**नागपूर । रयत समाचार**

मराठीतील संवेदनशील पर्यावरणवादी लेखक मणिक पुरी यांच्या 'तळे, पक्षी, माळरान' या पुस्तकाला विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांच्या वतीने देण्यात येणारा २०२५ सालचा अरण्यऋषी मारुती चितमपल्ली स्मृती पर्यावरण संशोधन ग्रंथ पुरस्कार जाहीर झाला. विशेष म्हणजे याच वर्षी या पुरस्काराची सुरुवात करण्यात आली असून, पहिल्याच वर्षी हा मान मणिक पुरी यांच्या पर्यावरणग्रंथाला मिळाल्याने साहित्य व पर्यावरण क्षेत्रात आनंद व्यक्त केला जात आहे. 'तळे, पक्षी, माळरान' या पुस्तकातून लेखकाने विदर्भातील जलस्रोत, पक्षीजीवन आणि माळरान परिसंस्थेचे अत्यंत सूक्ष्म, अभ्यासपूर्ण आणि तरीही रसाळ शब्दचित्र उभे केले आहे. पर्यावरण संवर्धनाचा संदेश साहित्यिक सौंदर्याबरोबर पोहोचवणारा हा ग्रंथ वाचक आणि अभ्यासकांमध्ये विशेष चर्चेत राहिला आहे. या पुरस्कारात रोख रक्कम, स्मृतीचिन्ह आणि शाल देऊन मनिक पुरी यांचा सन्मान करण्यात येणार आहे. अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांच्या विचारधारेचा वारसा जपणाऱ्या या पुरस्कारासाठी मणिक पुरी यांची निवड ही पर्यावरण साहित्य क्षेत्रासाठी गौरवास्पद बाब मानली जात आहे. पर्यावरण जाणीव आणि साहित्य यांची सुंदर सांगड घालणाऱ्या या यशाबद्दल मणिक पुरी यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## दिया, इशिकाचा जागतिक विक्रम

### शरद पवारांची कौतुकाची थाप



**अहमदनगर । विजय मते**

उत्तर युरोपातील एस्टोनिया येथे आयोजित जागतिक रोबोटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत अहिल्यानगरच्या दिया प्रीतम छाजेड व इशिका अभिजीत अडसूळ या दोन भारतीय विद्यार्थिनींनी जागतिक विक्रम प्रस्थापित करत भारताचे नाव उज्ज्वल केले. जगातील ७० देशांतील दोन हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना मागे टाकत त्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. या दैदीप्यमान यशाबद्दल माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांनी दोघींनाही कौतुकाची थाप देत अभिनंदन केले.

एस्टोनिया येथे दरवर्षी आयोजित होणाऱ्या या प्रतिष्ठेच्या आंतरराष्ट्रीय रोबोटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत यंदा दिया छाजेड व इशिका अडसूळ यांनी सर्व फेऱ्या यशस्वीरीत्या पार करत जगात 'नंबर वन' होण्याचा मान मिळवला. त्यांनी मोबाईलवर ऑपरेट होणारा शेतीसाठी उपयुक्त रोबोट तयार केला होता. ७० प्रगत देशांतील २ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांच्या सहभागातून मिळवलेले हे यश अत्यंत अभिमानास्पद असल्याचे मत शरद पवार यांनी व्यक्त केले. पवार यांनी केलेल्या कौतुकाने आम्ही भारावून गेलो असल्याची भावना दिया छाजेड व इशिका अडसूळ यांनी व्यक्त केली. त्यांच्या या यशामुळे अहिल्यानगरसह देशाच्या रोबोटिक्स व तंत्रज्ञान क्षेत्रात नव्या पिढीसाठी प्रेरणा निर्माण झाली आहे.

## विदुषी शोभा गुर्टु यांच्या स्मृतींना उजाळा

### 'स्वर-श्रृंगार' संगीत मैफलीचे आयोजन



**पणजी । रयत समाचार**

ठुमरी गायन क्षेत्रातील महान गायिका विदुषी शोभा गुर्टु यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'स्वर-श्रृंगार' या विशेष संगीत मैफिलीचे आयोजन गीत-शकुन, पणजी यांच्या वतीने करण्यात आले. २०२४२५ हे वर्ष विदुषी शोभा गुर्टु यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून देशभर विविध संगीत मैफिलींच्या माध्यमातून साजरे करण्यात आले. त्याच अनुषंगाने गोव्यातही त्यांच्या संगीत वारशाला उजाळा देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. गीत-शकुन, पणजी आणि इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझा यांच्या संयुक्त सहकार्याने बुधवार, ता. २४ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझा, पणजी येथील परिषद सभागृहात ही संगीत मैफल आयोजित करण्यात आली आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी विदुषी शोभा गुर्टु यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी डॉ. शकुंतला भरणे यांचे गायन होणार आहे. त्यानंतर आकाशवाणी केंद्राचे टॉप ग्रेड गायक पं. नरेश मल्होत्रा यांचे सोलो गायन सादर करण्यात येणार आहे. पं. नरेश मल्होत्रा हे सींग बंधूंचे शागिर्द असून त्यांच्या गायनावर उस्ताद अमिर खाँ यांच्या गायकीचे संस्कार स्पष्टपणे जाणवतात. या मैफिलीत तबल्यावर रोहिदास परब तर संवादिनीवर गोपाळ प्रभू साथसंगत करणार आहेत. संपूर्ण कार्यक्रमाचे निवेदन सनथ भरणे व शुभेच्छा भरणे करणार आहेत. हा कार्यक्रम सर्व रसिकांसाठी खुला असून संगीतप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या स्वरमय संध्याकाळीचा आनंद घ्यावा, असे आवाहन गीत-शकुन, पणजी संस्थेचे व्यवस्थापक व अध्यक्ष शैलेश भरणे यांनी केले आहे.

## राजस्थानातील १५ गावांत 'डिजिटल बंदी'चा पंचायत निर्णय

### मुलींच्या स्मार्टफोन वापरावर निर्बंध

**जालोर । रयत समाचार**

राजस्थान राज्यातील जालोर जिल्हा येथील एका स्थानिक सामुदायिक पंचायतीने धक्कादायक निर्णय घेत १५ गावांमध्ये मुलींच्या स्मार्टफोन वापरावर बंदी घातली आहे. या निर्णयानुसार महिलांना व मुलींना लग्नसमारंभ, सार्वजनिक कार्यक्रम तसेच शेजाऱ्यांच्या घरी जाताना कॅमेरा असलेले मोबाइल फोन बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. पंचायतीच्या म्हणण्यानुसार, या निर्णयामागे ''सामाजिक शिस्त'' आणि ''परंपरेचे संरक्षण'' हा उद्देश असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, या आदेशामुळे महिलांच्या वैयक्तिक स्वातंत्र्यावर गदा येत असल्याची टीका विविध स्तरांतून होत आहे. शिक्षणासाठी सवलत, पण मर्यादित महत्त्वाची बाब म्हणजे, शिक्षण घेत असलेल्या मुलींना घरात शैक्षणिक कारणांसाठी स्मार्टफोन वापरण्याची मुभा देण्यात आली आहे. मात्र, तो वापरही बाहेर न नेता केवळ घरापुरताच मर्यादित ठेवण्यात आला आहे. हक्कांवर प्रश्नचिन्ह या निर्णयामुळे डिजिटल दरी अधिक वाढण्याची आणि ग्रामीण भागातील मुली आधुनिक तंत्रज्ञानापासून दूर राहण्याची भीती व्यक्त होत आहे. सामाजिक कार्यकर्ते व महिला हक्क संघटनांनी या निर्णयाला प्रतिगामी आणि असंवैधानिक ठरवत विरोध दर्शविला आहे. दरम्यान, हा निर्णय कायदेशीर चौकटीत बसतो का? आणि राज्य सरकार किंवा प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## विद्यमान सरपंचांनाच 'प्रशासक' नेमण्याची मागणी

### गावगाडा वाचवण्यासाठी सरपंच सेवा संघाचा एल्गार



**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**

राज्यातील ग्रामीण लोकशाहीचा कणा असलेल्या सुमारे १४,२३४ ग्रामपंचायतींची पाच वर्षांची मुदत फेब्रुवारी २०२६ मध्ये संपत आहे. या पार्श्वभूमीवर गावांचा विकास थांबू नये आणि लोकशाही मूल्यांचे संरक्षण व्हावे, यासाठी सरपंच सेवा संघ आक्रमक झाला आहे. संघटित सरपंच चळवळीचे नेतृत्व करणारे बाबासाहेब पावसे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यपालांना निवेदन देण्यात आले. मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर बाहेरील सरकारी प्रशासक न नेमता विद्यमान सरपंचांनाच 'प्रशासक' किंवा 'केअरटेकर' म्हणून अधिकार द्यावेत, अशी मागणी यावेळी केली. बाबासाहेब पावसे म्हणाले की, एकाच वेळी १४,२३४ ग्रामपंचायतींची मुदत संपणे ही मोठी प्रशासकीय बाब आहे. सर्व ठिकाणी सरकारी अधिकारी प्रशासक म्हणून नेमल्यास एका अधिकाऱ्यावर १० ते १५ गावांचा भार येईल. त्यामुळे ग्रामीण जनतेला दाखले व इतर कामांसाठी तालुक्याच्या ठिकाणी हेलपाटे मारावे लागतील. पाच वर्षे गावाचा कायापालट करणाऱ्या आणि स्थानिक प्रश्नांची जाण असलेल्या सरपंचांनाच ही जबाबदारी देणे लोकशाहीच्या दृष्टीने हिताचे ठरेल, असे त्यांनी स्पष्ट केले. फेब्रुवारीमार्च हा आर्थिक वर्षाचा शेवटचा काळ असून अनेक गावांमध्ये १५ व्या वित्त आयोगाचा निधी व जलजीवन मिशनसारख्या योजनांची कामे सुरू आहेत. अचानक नवीन प्रशासक आल्यास तांत्रिक बाबी समजून घेण्यास वेळ लागेल आणि विकासनिधी अखर्चित राहण्याची भीती आहे. उन्हाळ्याच्या तोंडावर पाणीटंचाई, टँकर नियोजन व आपत्कालीन निर्णयांसाठी लोकनियुक्त सरपंच अधिक प्रभावी ठरतो, असेही संघाने नमूद केले. या निवेदनावर सरपंच सेवा संघाचे पदाधिकारी व राज्यातील सरपंच प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्या असून, मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.



# लोकशाही उत्सव

## अहिल्यानगर महानगरपालिका निवडणूक - २०२५-२६




# विडीकामगाराच्या घरातून लाल सलामपर्यंत विसरलेला वारसा




परवा लोकसत्तामध्ये कम्युनिस्टपक्षाला १०० वर्षे झाल्याबद्दल लेख वाचला अन् आठवणी जाग्या झाल्या. वडील विडीकामगार अन डाव्या चळवळीत होते. त्यामुळे कॉम्रेड, विळा-कणीस, आंदोलन, मोर्चे हे शब्द लहानपणी कानावर. मोर्चे पाहिले, वडिलांना दोनदा अटक एकदा तर नागपूर जेलमध्ये. युगांतर मासिक येई. विडी कारखान्यात अन सामूहिक वाचन होई. इतर कामगार विड्या बांधित बांधित कान देऊन ऐकत. जो वाची त्याला त्या वेळात जितक्या विड्या बांधल्या असत्या तितक्या वर्गणी गोळा करावी, तशा विड्या गोळा करून दिल्या जात. आजही मला ही पद्धत विलक्षण वाटते. डावे असे या बाबतीत उजवे. पुढे मी ही सुट्टीत वाचायला लागलो अन आठवडा पगार झाला की, ५-१० पैसे मिळत. काय असे त्यात? रशिया, मार्क्स, लेनिन, रुझव्हेल्ट, ब्रेनझनेव्ह ते डांगे, जोशी, रांगणेकर, रणदिवे अभ्यंकर, बसू अन जागतिक ते प्रादेशिक घडामोडी. कॉम्रेड नागरे, कॉम्रेड उगले हे त्याकाळी विडी कामगार पुढारी अकोले, संगमनेर भागात. आजही कॉम्रेड डॉ. अजित नवले कम्युनिस्ट चळवळीत सक्रिय आहेत. कलापथक हे कम्युनिस्ट पार्टीचे प्रचाराचे मोठे व्यासपीठ अन् तेव्हा अण्णाभाऊ साठे, शाहीर अमर शेख आघाडीवर. कलापथक आले की, कलाकार जेवणासाठी विभागून जात जेवायला विडी कामगारांच्या घरी. आमच्या घरी मी अनेकदा कलापथक कलाकारांना जेवण वाढले आहे तेव्हा. सुक्या बोंबलाचा रस्सा अन् बाजरीची भाकरी हा बेत. क्वचित मटण. वडील ठार निरक्षर असूनही आयुष्यभर प्रखर नास्तिक म्हणून जगले अन् तो वारसा माझ्याकडेही आला. तेव्हाच्या अहमदनगर जिल्ह्यात एकेकाळी १४ पैकी १३ आमदार कम्युनिस्ट पार्टीचे.अण्णासाहेब शिंदे, भाऊसाहेब थोरात, वकीलराव लंघे, दत्ता देशमुख, पी.बी. कडू, बाबासाहेब ठुबे, बुवासाहेब नवले, अकोले मतदारसंघांचे तेव्हाचे आमदार बी.के. देशमुख ही काही मंडळी सतत आघाडीवर. काही शेवटपर्यंत पक्षात राहिले तर काही काँग्रेसमध्ये गेले. यातील बऱ्याच जणांच्या माझ्या ओळखी होत्या. गप्पा, चर्चा वगैरे करण्याची संधीही मिळाली एकेकाळी. काही जणांनी आत्मचरित्रे लिहिली. काहींची चरित्रे, जी माझ्या संग्रही आहेत. त्यातून मग कॉम्रेड श्यामराव परुळेकर, गोदाताई परुळेकर अन त्यांचे माणूस जेव्हा जागा होते हे पुस्तकं. कॉम्रेड डांगे ते पश्चिम बंगालमधील काम, जमीनदारी नामशेष, ज्योती बसू अन् त्यांचे दीर्घकाल मुख्यमंत्रीपद, बुद्धदेव भट्टाचार्य अन् त्याची साधी राहणी, त्रिपुराचे सलग २० वर्षे मुख्यमंत्रीपदी राहिलेले माणिक सरकार, जे अनेक वर्षे पदावरून राहूनही निवृत्त झाल्यावर स्वतः चे घर नसलेले मुख्यमंत्री. आज स्वप्नवत वाटावे, असा एक पट डोळ्यासमोर आला. सोलापूर जिल्ह्यात कॉ. नरसय्या आडम. यांना आडममास्तर म्हणून ओळखले जात. विडी कामगारांसाठी भरीव काम केले. विशेषतः त्यांच्यासाठी घरे बांधून दिली स्वस्तात. त्याची जगभरात दखल घेतली गेली. भारतीय राजकारणात दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष अन्सरकारवरील वचक जवळून पाहिला. ज्योती बसू यांना पॉलिटब्युरोने पंतप्रधानपदाची संधी नाकारली, तेव्हा मला व्यक्तीशः फार वाईट वाटले होते. किंबहुना ज्योती बसू, कॉम्रेड डांगे, दत्ता हे मला हिरोच वाटत. कॉम्रेड डांगे तेव्हा हजार रुपये किलोचा चहा पीत तर ज्योती बाबू दरवर्षी महिनाभर सुट्टी लंडनमध्ये घालीत. ज्योती बसू यांच्या मुलाने मेबॅक ही महागडी गाडी कर चुकवून आणली. ते प्रकरण महाग गाडी अन् नियम भंग म्हणून एकेकाळी फार गाजले. तसेच फार काळ सरचिटणीस म्हणून राहिलेल्या हरकिसनसिंग सुरजीत यांच्या नातवाचे शाही लग्नही. हळू हळू पक्ष कमजोर झाला. पश्चिम बंगाल, त्रिपुरामधील सत्ता गेली, केरळमध्ये आघाडी अजून टिकून. महाराष्ट्र विधानसभेत एक आमदार फक्त. महाराष्ट्रात डॉ. प्रकाश रेड्डी अन अजित अभ्यंकर, अजित नवले ई वगळता डावे पुढारी माध्यमातून नाही डोकावत फारसे. माझे एक नातेवाईक डाव्या चळवळीत होते. एकदा त्यांचा अपघात झाला, पुण्यात संचेती रुग्णालयात उपचार घेत होते. दररोज एक एस.टी. भरून पक्ष सदस्य भेटायला येत. मी एकदा गेलो तेव्हा तिथले डॉक्टर म्हणाले इतका लोकप्रिय पुढारी या दवाखान्यात आजवर आम्ही नाही पाहिला. ते पक्ष सोडून काँग्रेसमध्ये गेले तेव्हा मी त्यांना एक अंतरदेशीय पत्र, भरून मजकूर, पाठविले होते. त्यात कडक भाषा अन् आवडला नाही निर्णय असे. आज मलाच हसू येते. पण तेव्हापासून त्यांच्या माझ्यातील मैत्री दुरावली अन ती औपचारिक पातळीवर राहिली. अरुंधती रॉय यांचे बरेच साहित्य वाचले. त्यात वॉकिंग विद कॉम्रेड माझे आवडते. काही काळ मी समाजवादी विचारधारेकडे आकर्षित झालो पण फार रमलो नाही. डावेच खालच्या आर्थिक स्थरातील वर्गासाठी ठोस काही करतील ही माझी धारणा आजही आहे. नुकतेच केरळ अत्यंत दारिद्र या वर्गात एकही नागरिक नाही यात पहिले राज्य तसेच मानवीजीवन निर्देशांकातही दरडोई सर्वात जास्त मजुरी, शिक्षण प्रमाण, स्त्री पुरुष समानता, स्वच्छता आदी. कम्युनिस्ट भ्रष्ट नाही झाले, भारतात तरी, ही त्यांची मोठी जमेची बाजू. आज एकूण राजकीय अवकाश पाहता नजिकच्या काळात कम्युनिस्ट पक्ष फार वाढेल, अशी कोणतीच परिस्थिती नाही. पण जसे ''गांधी कधी मरत नसतो'' असे म्हणतात तसे ''कम्युनिस्ट कधी कालबाह्य होत नाहीत, होणार ही नाहीत.'' आज गरीब श्रीमंत दरी जी अमानवी पातळीवर वाढलीय ती पाहता जगात परत कम्युनिस्ट विचारधारेच्या आधारावर आर्थिक पुनर्मांडणीकरणारी सरकारे गरजेची आहेत. तसे होवो अशी अपेक्षा करूयात. भारतीय कम्युनिस्ट पक्षाला १०० वर्षे झाली. त्याबद्दल अभिनंदन आणि शुभेच्छा! कम्युनिस्ट विचारधारेचा माझ्यावर खोलवर परिणाम झाला. मी सहजपणे नास्तिक झालो, गैरमार्गाने संपती मिळवण्याची कधीच इच्छा नाही झाली. नंतर-नंतर संपत्तीसंचय अन् एकूणच संपतीविषयी उदासीनता आली. मध्यमवर्गीय जगणे फार भावले नाही. डीक्लास विषयी आदर. नोकरीत, वैयक्तिक जगण्यात या वर्गाशी नेहमी आदराने वागत आलो. ग्रामीण शेतीपद्धती, कुटुंबपद्धती पासून कधी दुरावलो तर नाहीच पण आजही गावी गेलो की, त्यांच्यात समरस होऊन सहजपणे राहताना अडचण येत नाही. म्हणून कम्युनिस्ट आणि मार्क्स माझी आस्था अन् आवडही. सर्वकॉम्रेड्सना लाल सलाम.

*(लेखक डॉ. बा.सा. कोकण कृषी विद्यापीठातून सहयोगी प्राध्यापक, सिंचन आणि निचरा विभागातून सेवानिवृत्त आहेत)*



**सुखदेव काळे**
दापोली, रत्नागिरी
९७६६७७३८५०

**स्मृतिवार्ता**

# माझी भुमिका, आपले प्रगतीपुस्तक



नगरसेवक होणे हे केवळ शोभेचे पद नसून जनतेची सेवा करण्याची संधी असते. सामान्य नागरिकांना स्थानिक स्वराज्य संस्थेकडून काय अपेक्षा असतात, तर भरलेल्या टॅक्सच्या बदल्यात हक्काच्या सेवा. जर त्या मिळत नसतील तर आपल्या वतीने इमानदारीत भांडणारा लोकप्रतिनिधी म्हणजेच नगरसेवक. आपल्या प्रभागाचे वैशिष्ट्य म्हणजे ९९% टॅक्स भरणारे नागरिक. पण त्यांना हक्काच्या सेवा मिळणार नसतील तर, हा अन्याय आहे. जर मला ही संधी मिळाली, तर मी प्रभागासह शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे काम करीन. आपण सगळे आजुबाजूची परिस्थिती पाहून नेहमी चर्चा करतो, राजकारणात स्वच्छ चरित्राचा, प्रामाणिक व सुशिक्षित उमेदवार आले पाहिजे, जो कोणा पुढाऱ्याचा पंटर नसेल. आता लोकांची इच्छा आणि गरजही तीच आहे. आजकाल आपण पाहतो की, सर्वांचा मोठा पैसा शिक्षण आणि आरोग्य या गोष्टीवर खर्च होतो. तसेच बेरोजगार तरुणांची संख्या वाढताना दिसून येते. यासाठी प्रशासकीय योजना भरपूर आहेत परंतु त्यांची प्रभावी उपाययोजना दिसून येत नाही. त्यासाठी आपण लोकसहभागासह कार्यरत राहू. महानगरपालिकेच्या प्रमुख कर्तव्यांमध्ये रस्ता, वीज, पाणी आणि सार्वजनिक आरोग्य यांचा समावेश आहे. परंतु आपल्या प्रभागात याची वाणवा आहे. मी लोकांसाठी हीच मुख्य कामे करणार आहे. योग्य नियोजन व निसर्गाचा समतोल राखून ती कामे करण्याचा प्रयत्न करेल. आजकाल सार्वजनिक कामामुळे जनतेची गैरसोय खूप मोठ्या प्रमाणावर होताना दिसून येत आहे. मी यावर योग्य पद्धतीने नागरिकांना विश्वासात घेऊन काम करणार आहे. नगरसेवक हे शोभेचे पद नसून लोकसेवेची संधी आहे, याचा विसर पडणार नाही. अभिजित अशोक दरेकर.

**प्रभाग क्रमांक - ३.**
**संपर्क : ९८९०६७९९९९**



# आचारसंहिता भंग केल्यास थेट गुन्हे दाखल- आयुक्त डांगे

## प्रचार रॅली-सभांसाठी ४८ तास आधी परवानगी अनिवार्य

**अहमदनगर । रयत समाचार**

महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होताच शहरात आदर्श आचारसंहितेची कडक अंमलबजावणी सुरू झाली. राज्य निवडणूक आयोगाच्या स्पष्ट निर्देशानुसार, प्रचार सभा व प्रचार रॅली आयोजित करण्यासाठी किमान ४८ तास अगोदर लेखी परवानगी घेणे बंधनकारक असल्याचे मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी तथा आयुक्त यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले. तसेच प्रचारासाठी वापरले जाणारे बॅनर, पोस्टर, वाहनांवरील जाहिरात, तसेच सोशल मीडियावरील प्रचार साहित्यालाही पूर्वपरवानगी आवश्यक आहे. उमेदवारासोबत सूचक व अनुमोदकांचे ना-देय प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे अनिवार्य असून, आचारसंहितेचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात येतील, असा कडक इशाराही त्यांनी दिला. शहरातील विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसाठी महानगरपालिकेत आयोजित बैठकीत निवडणूक प्रक्रिया, उपलब्ध सुविधा, उमेदवारी अर्ज, विविध प्रकारच्या परवानग्या आणि राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांची सविस्तर माहिती देण्यात आली. यावेळी आयुक्त डांगे यांच्यासह सर्व निवडणूक अधिकारी व आचारसंहिता कक्षाचे प्रमुख उपस्थित होते. आयुक्त डांगे यांनी पुढे माहिती देताना सांगितले, जाहीर प्रचार १३ जानेवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंतच करता येणार आहे. मतमोजणी राज्य वखार महामंडळाच्या एमआयडीसी येथील गोडावून क्रमांक ६ व ७ येथे होणार आहे. राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी ए-बी फॉर्म ३० डिसेंबर रोजी दुपारी २ वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. निवडणूक खर्चाचा तपशील दररोज सादर करणे बंधनकारक असून, नामनिर्देशन पत्रासोबत सर्व आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. उमेदवारी अर्जासोबत जातवैधता प्रमाणपत्र, ना-देय प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असून, नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्राची आवश्यकता नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. निष्पक्ष व शांततेत निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी सर्वांनी आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# भयमुक्त नगरचे काय झाले? अहिल्यानगरकरांचा सवाल !

ऐतिहासिक अहमदनगर नगरपरिषदेची ओढूनताढून महानगरपालिका केली. मनपाच्या पहिल्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघप्रणीत भाजपा-शिवसेना युतीने कै. अरूणकाका जगताप, भानुदास कोतकर आणि कै. शिवाजी कर्डीले यांच्या टीमच्या ताबेमारी, गुंडगिरी आदींपासून शहराला मुक्त करण्यासाठी 'भयमुक्त नगर' ही घोषणा दिली होती. त्याचकाळात झोपडी कँटिनमागील मोठी झोपडपट्टी बिल्डरांच्या फायद्यासाठी हटविण्यात आली होती.

'भयमुक्त नगर' ही आयडिया मुळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील तथाकथित चाणक्यांचीच असल्याची चर्चा तेव्हा उघडपणे होत होती. विशेष म्हणजे ही घोषणा पांढरपेशा वर्गाने उचलून धरली होती. महानगरपालिकेच्या पहिल्या निवडणुकीत भाजपा-सेनेचे अनेक उमेदवार निवडून आले, नगरसेवक झाले. सामान्य नागरिकांना ही घोषणा अपील झाल्याचे हे स्पष्ट चिन्ह होते. शिवसेनेचे भगवान फुलसौंदर प्रथम महापौर झाले, कै. ज्ञानेश्वर खांडरे प्रथम उपमहापौर तर भाजपाचे भैरवनाथ वाकळे प्रथम विरोधी पक्षनेते ठरले. त्यानंतर पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले. साधारण २२२३ वर्षांचा हा प्रवास आहे. आजच्या घडीला परिस्थिती पूर्णपणे बदललेली दिसते.

कै. अरूणकाका जगताप यांचे चिरंजीव संग्राम जगताप हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार असून ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघासोबत सक्रिय असल्याचे अनेकदा उघडपणे दिसते. आरएसएसची धोरणे ते राबवत असल्याचेही सतत जाणवते. ते कै. शिवाजी कर्डीले यांचे जावई आहेत तर भानुदास कोतकर हे येत्या निवडणुकांत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ- भाजपाशी जुळवून घेत निवडणूक लढवण्याच्या तयारीत आहेत. याच राजकीय प्रवासात पूर्वाश्रमीचे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नेते राधाकृष्ण विखे पाटील आणि त्यांचे चिरंजीव, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील हेही आज राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भाजपाचे सक्रिय सभासद, सहकारी आणि नेते, कार्यकर्ते बनलेले आहेत. आज परिस्थिती अशी आहे की, ज्यांच्यापासून 'भयमुक्त नगर' करायचे होते, तशी घोषणा देवून मते पटकाविली होती, तेच लोक सत्तेच्या आणि संघटनेच्या केंद्रस्थानी बसलेले आहेत.




रा.स्व.संघ भाजपाचे मुळ निष्ठावान लोक सतरंज्या उचलणाराच्या भुमिकेत अनेकदा दिसतात. त्यामुळेच अहिल्यानगर महानगरपालिकेतील नागरिक खाजगीत का होईना, पुन्हा एकदा 'भयमुक्त नगर' करण्याची गरज व्यक्त करत आहेत. ही संपूर्ण प्रक्रिया म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ-भाजपाने सामान्य अहिल्यानगरकरांसोबत खेळलेले सांस्कृतिक राजकारणाचे खेळ आहेत. 'भयमुक्त नगर' या घोषणेचा वापर करून नागरिकांचा विश्वास मिळवायचा आणि नंतर त्याच सत्ताकेंद्रांभोवती पुन्हा राजकारण गुंफायचे, हेच या खेळीचे वास्तव आहे.

'सामना' चित्रपटात सामान्य माणसाची भूमिका साकारणारे डॉ. श्रीराम लागू गावगुंड पुढारी निळू फुले यांना सतत एकच सवाल करत असतात, ''मारुती कांबळेचं काय झालं?'' अगदी तसाच सवाल आज राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भाजपा- सेनेला विचारण्याची वेळ आली आहे, ''भयमुक्त नगर'चं काय झालं?'' आणि त्याहूनही थेट प्रश्न असा आहे ''अहिल्यानगरच्या जनतेने आता तुमच्यापासूनच 'भयमुक्त नगर' व्हायची वेळ आली आहे, याची जाणीव आहे का?'' आज पुन्हा एकदा आरएसएस आणि भाजपापासून 'भयमुक्त नगर' करण्याची वेळ आली आहे, अशी भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.



**भैरवनाथ वाकळे**
संपादक, रयत समाचार
९४०५४०१८००

**ग्यानबाची मेख**

# महापालिका निवडणुकीत भाजपची कसरत


## इच्छुक उमेदवारांमध्ये नाराजी

**रयत समाचार । तुषार सोनवणे**

महापालिका निवडणूक प्रक्रियेला काल पासून सुरुवात झाली असली तरी भाजपाच्या इच्छुक उमेदवारांमध्ये अस्वस्थता वाढलेली दिसत आहे. उमेदवारी जाहीर करण्यात होणाऱ्या विलंबामुळे भाजपमध्ये नाराजीचे सूर उमटू लागले आहेत. बंडखोरी टाळण्यासाठी शेवटच्या क्षणापर्यंत उमेदवारी जाहीर न करण्याची रणनीती भाजपकडून आखली जात असल्याची चर्चा आहे. महापालिकेसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून कालपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

भाजपकडून इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या असून मोठ्या संख्येने इच्छुकांनी पक्षाकडे उमेदवारीसाठी अर्ज केले आहेत. मात्र अद्याप अधिकृत उमेदवारांची घोषणा झालेली नाही. सूत्रांच्या माहितीनुसार, भाजपकडून उमेदवार निवड करताना मोठ्या प्रमाणात जुन्या कार्यकर्त्यांना डावलण्यात येणार नसून नव्या चेहऱ्यांना संधी दिली जाण्याची शक्यता आहे. मात्र नेमकी यादी कधी जाहीर होणार, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. यामुळे इच्छुक उमेदवारांमध्ये अस्वस्थता वाढली आहे.

दरम्यान, महायुतीमध्येही बंडखोरीची शक्यता वर्तवली जात आहे. भाजप, अजित पवार गट व शिवसेना शिंदे गट यांच्यात जागावाटपावरून अंतिम निर्णय होणे बाकी आहे. कोणत्याही परिस्थितीत तिन्ही पक्ष एकत्र लढणार की स्वतंत्रपणे, याबाबत सध्या अनिश्चितता आहे. महापालिकेतील एकूण १७ प्रभागांमधून चार नगरसेवक निवडले जाणार आहेत. प्रत्येक प्रभागातून चार जागांसाठी भाजप, राष्ट्रवादी अजित पवार गट व शिंदेसेनेकडून प्रत्येकी चार इच्छुक उमेदवार असल्याने पॅनल तयार करण्यात अडचणी येण्याची शक्यता आहे. त्यामुळे ऐनवेळी बंडखोरी होण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.



हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय :** श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफिसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

## पाण्यासाठी ‘नो कॉम्प्रमाईज’

# करण ससाणेंची अधिकाऱ्यांना ताकीद

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची तडजोड चालणार नाही. काय होते, काय झाले यामध्ये न अडकता श्रीरामपूर शहरातील नागरिकांना स्वच्छ व मुबलक प्रमाणात पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे, अशा स्पष्ट सूचना नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्ष करण ससाणे यांनी नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

आमदार हेमंत ओगले यांच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्यासाठी अतिरिक्त आवर्तनाची मागणी करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. नगरपरिषदेने एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येणार असल्याची घोषणा केल्यानंतर नगराध्यक्ष ससाणे यांनी तातडीने नगरसेवकांसह साठवण तलावास भेट देत पाहणी केली व पाणीपुरवठ्याचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सचिन गुजर, शहराध्यक्ष



**नगराध्यक्ष करण ससाणे यांनी आपल्या कार्यकाळातील पहिले पत्र पिण्याच्या पाण्याचे आवर्तन तातडीने सोडण्याबाबत मागणी करत दिले. श्रीरामपूर तालुक्याचे भाग्यविधाते माजी आमदार स्व. जयंतराव ससाणे व राजश्रीताई ससाणे यांच्या कार्यशैलीप्रमाणेच करण ससाणे यांचे कामकाज राहील, याबाबत तिळमात्र शंका नसल्याचे मत जिल्हाध्यक्ष सचिन गुजर यांनी व्यक्त केले.**

अण्णासाहेब डावखर, बाबासाहेब दिघे, ज्येष्ठ नगरसेवक मुजफ्फर शेख, दिलीप नागरे, राजेंद्र पवार, योगेश जाधव, रईस जहागिरदार, कलीम कुरेशी, लकी सेठी, सुभाष पोटे, दिपक वमने, बिट्टू कक्कड, निलेश नागले, संतोष परदेशी, रितेश एडके, अफरोज शहा, प्रवीण कोठावळे, अभिजित लिप्टे, सिद्धार्थ सोनवणे, सागर कुऱ्हाडे, भाग्येश लोखंडे, अतुल शेटे तसेच नगरअभियंता अभिजित मराठे व निलेश बकाल उपस्थित होते. नगराध्यक्ष ससाणे म्हणाले की, श्रीरामपूर शहरातील नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

पाणी, आरोग्य, वीज व बांधकाम या विभागांमध्ये तातडीने बदल करणे गरजेचे असून त्याबाबत लवकरच निर्णय घेतले जातील. नगराध्यक्ष ससाणे हे लवकरच नगराध्यक्ष पदाचा अधिकृत कार्यभार स्वीकारणार असून, त्याआधीच त्यांनी साठवण तलावाची पाहणी करून पिण्याच्या पाण्याचा आढावा घेतला.



## टाकळी विद्यालयाच्या शैक्षणिक सहलीतून

# ऐतिहासिक, धार्मिक, भौगोलिक दर्शन

**कर्जत । रिजवान शेख**

दादा पाटील विद्यालय, टाकळी खंडेश्वरी यांच्या वतीने सन २०२५२६ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसांची एक मुक्कामी शैक्षणिक सहल यशस्वीपणे आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांना ऐतिहासिक, भौगोलिक व धार्मिक स्थळांचे प्रत्यक्ष ज्ञान मिळावे, या उद्देशाने या सहलीचे नियोजन करण्यात आले होते. या शैक्षणिक सहलीचा मार्ग टाकळी खंडेश्वरी, सिद्धटेक, सिंहगड किल्ला, खडकवासला धरण, एकवीरा देवी, कार्ले लेणी, महड गणपती, पाली गणपती, रोहा, रेवदंडा किल्ला, नागाव बीच, कुलाबा किल्ला, अलिबाग असा होता. सहलीदरम्यान विद्यार्थ्यांना प्रत्येक स्थळाची ऐतिहासिक, भौगोलिक व धार्मिक माहिती सविस्तरपणे समजावून सांगण्यात आली. तसेच सहल अहवाल लेखनाबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या शैक्षणिक सहलीत एकूण ८८ विद्यार्थी व ८ शिक्षक सहभागी झाले होते. सहलीसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक दादासाहेब गांगर्डे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. सहलप्रमुख म्हणून प्रवीण जाधव यांनी जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. सहलीत सहभागी शिक्षकांमध्ये गणेश शेळके, बिभीषण पोपळे, श्रीमती पवार, अतुल चव्हाण, संजय वाघ व सचिन पानपट यांचा समावेश होता. सदर शैक्षणिक सहल अत्यंत आनंदी, शिस्तबद्ध व उत्साही वातावरणात पार पडली. विद्यार्थ्यांनी प्रत्येक स्थळाची माहिती आत्मसात करताना मोठा उत्साह दाखवला, त्यामुळे ही सहल त्यांच्या शैक्षणिक जीवनातील एक संस्मरणीय अनुभव ठरली. तसेच सहलीसाठी टाकळी ग्रामस्थ मोरे कुटुंबीयांनी पाली येथे मुक्कामाची सोय व रोहा येथे उत्कृष्ट नाश्त्याची व्यवस्था केली. याबद्दल विद्यालयाच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले. ही सहल सुनियोजित व व्यवस्थित पार पडल्याबद्दल मुख्याध्यापक, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य तसेच सर्व ग्रामस्थांनी सहभागी शिक्षक व एस.टी. बस चालकांचे अभिनंदन केले.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या पत्नी यशोदाबेन यांचे शनीदर्शन



**नेवासा । विजय खंडागळे**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पत्नी यशोदा बेन मोदी यांनी शनिवारी सायंकाळी श्रीक्षेत्र शनिशिंगणापूर येथे भेट देत शनीदेवाचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी शनीदेवाला अभिषेक केला. देवस्थानच्या वतीने तसेच तीळवन तेली समाज बांधवांच्या वतीने पत्रकार विजय खंडागळे, कार्यकर्ते भीमा महाले, संजय क्षीरसागर, अंजली महाले व योगिता महाले यांनी यशोदा बेन मोदी यांचे स्वागत करून शनीप्रसाद देत सन्मान केला. यावेळी त्यांच्यासोबत त्यांचे नातेवाईकही उपस्थित होते. शनीदेवाच्या दर्शनामुळे मला आनंद व समाधान मिळाल्याची भावना यशोदा बेन मोदी यांनी चर्चेदरम्यान व्यक्त केली. शनीदेवाचा इतिहास तसेच या परिसरातील गावांची ख्याती याबाबतची माहिती त्यांना यावेळी देण्यात आली. त्यांनी मोठ्या आपुलकीने सर्व माहिती ऐकून घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पत्नी यशोदा बेन यांच्या समाज बांधवांशी झालेल्या भेटीमुळे आमचं भाग्य लाभल्याची भावना समाजाच्या वतीने पत्रकार विजय खंडागळे यांनी व्यक्त केली. त्यांचा स्वभाव शांत, अत्यंत साधा असून त्यांची राहणीमान व विचारसरणी उच्च असल्याचे जाणवल्याचेही त्यांनी सांगितले. दरम्यान, मोदी परिवाराने महाले भव्येश यांच्या निवासस्थानी पारंपरिक पद्धतीचे पिठ्ठल, भाकर, पापड, लोणचे, चटणी आदी साधे जेवण कुटुंबासोबत घेतले. असा आनंद कुठेही मिळत नाही, असे त्यांनी आवर्जून सांगितल्याची माहिती देण्यात आली.

# डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेत आत्मा मालिकचा दबदबा

## श्रेयश भवर महाराष्ट्रात प्रथम

**कोपरगाव । किसन पवार**

मुंबई विज्ञान अध्यापक मंडळ आयोजित डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेत आत्मा मालिक सेमी इंग्लिश मिडीयम गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या स्पर्धेत गुरुकुलच्या तब्बल ४६ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळविले. ही परीक्षा इयत्ता सहावी व नववीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केली जाते. परीक्षेत संपूर्ण महाराष्ट्रातून मराठी माध्यमामध्ये आत्मा मालिक गुरुकुलचा विद्यार्थी श्रेयश भवर याने प्रथम क्रमांक मिळवून राज्यात अव्वल स्थान पटकावले. विशेष म्हणजे सलग दहाव्या वर्षी आत्मा मालिकचे सर्वाधिक विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत चमकले असून, विद्यार्थी व शिक्षकांच्या अथक परिश्रमातून हे यश मिळाल्याचे प्राचार्य निरंजन डांगे यांनी सांगितले. आजपर्यंत या स्पर्धेत गुरुकुलच्या २९५ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवून एक नवा ऐतिहासिक विक्रम प्रस्थापित केल्याची माहितीही त्यांनी दिली.



यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये इयत्ता सहावीतील अथर्व कोळपे, राजवीर कालेकर, कार्तिक शेटे, भूपती चव्हाण, स्वरा चौधरी, श्रेयश कासार, योगराज पवार, आराध्य बोऱ्हाडे, यशराज बराते यांचा समावेश आहे. तसेच इयत्ता नववीतील श्रेयश भवर, कृष्णा नेहे, कृष्णा लोखंडे, श्रेयश नलावडे, आरव नाणेकर, धनश पाटील, श्रीतेज इंगोले, श्लोक कदम, आयुष नवले, पृथ्वीराज टोपे, हर्षवर्धन खिंडकर, राम जाधव, चैतन्य मखमले, विश्वजीत त्र्यंबके, मयंक नाहिरे, अंकित पाटील, यश कनके, तनुष्का कोर्डे, कृष्णा किसे, आदित्य मोकाटे, सोहम मकाळ, दर्शन गिरासे, देवयानी वारंगुळे, ओम कदम, आदित्य भगत, ज्ञानेश्वरी काळे, प्रणव केदार, ओम पांगरे, यश निमसे, पृथ्वीराज मोरे, अथर्व नागवडे, विज्ञानी कुंभार, वेदांत काकडे, दर्शन ओव्हाळ, पार्थ मोरे, साईश मोरे व पार्थ काळे यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांना प्राचार्य निरंजन डांगे, विभाग प्रमुख अनिल सोनवणे, बाळकृष्ण दौंड, सचिन डांगे, पर्यवेक्षक नयना शेटे, गणेश रासने तसेच विषय शिक्षक सोपान शेळके, अमोल कर्डिले, अकांक्षा कळसकर, रिना पवार, अंजली तिवारी यांचे मार्गदर्शन लाभले. याशिवाय अथर्व फाऊंडेशनचे नंदकिशोर भाटे, राहुल मिश्रा, शिवम तिवारी, प्रियान्शु कुमार, हरिष तेली, संदिप कुमार, अनुष्का कुमारी, गौरव कापडणीस व अभिलाषा उन्हाळे यांनीही मोलाचे सहकार्य केले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, उपाध्यक्ष बाळासाहेब गोर्डे, सरचिटणीस हनुमंत भोंगळे, कोषाध्यक्ष विठ्ठल होन, विश्वस्त प्रकाश गिरमे, प्रदिपकुमार भंडारी, शालेय व्यवस्थापक सुधाकर मलिक, वसतिगृह व्यवस्थापक साईनाथ वर्पे, मिरा पटेल व प्राचार्य निरंजन डांगे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.


# विजयाराजे शिंदे विद्यालयाच्या विद्यार्थिनींची विभागीय थाय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर येथील वाळकी येथे संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय शालेय थाय बॉक्सिंग स्पर्धा २०२५ मध्ये श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी नेत्रदीपक कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले. या स्पर्धेत शर्वरी योगेश टकले, वैष्णवी ज्ञानदेव भागवत, श्रावणी भारत बगाडे, जान्हवी भागवत वायभासे व गौरी लोखंडे यांनी सुवर्णपदकांची कमाई केली. तसेच




तेजस्विनी शहाजी शिंदे हिने रौप्य पदक, तर सिद्धी शंकर मखरे व प्रीती विष्णू मोटे यांनी कांस्यपदक पटकावले. सुवर्णपदक मिळवलेल्या पाच विद्यार्थिनींची पुणे विभागीय शालेय थाय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. या यशस्वी विद्यार्थिनींना विभागप्रमुख किरण कोकणी तसेच ओम पांढरकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वर्षा भोईटे, उपमुख्याध्यापिका नीलिमा कातोरे, पर्यवेक्षक बाळासाहेब शिंदे तसेच गुरुकुलप्रमुख किरण शिंदे यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून पुढील विभागीय थाय बॉक्सिंग स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# श्रीरामपूर वकील संघावर चोरमल, परदेशी, आगे यांची निवड

## कदम महिला उपाध्यक्ष तर चित्रा कापसे सहसचिव

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

श्रीरामपूर वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड. संदीप चोरमल तर उपाध्यक्षपदी कुंदन परदेशी विजयी झाले आहेत. वकील संघाच्या कार्यालयात आज झालेल्या बैठकीत या निवडी करण्यात आल्या. झालेल्या निवडणुकीत अध्यक्ष पदासाठी संदीप चोरमल, संजय तांबे, समीन बागवान यांनी आपापले अर्ज दाखल केले होते.

निवडणुकीत संदीप चोरमल यांना १३९ संजय तांबे यांना ७९ तर जमीन बागवान यांना ६९ मते मिळाली. उपाध्यक्ष पदासाठी कुंदन परदेशी व रमाकांत राठोड यांनी अर्ज दाखल केले होते परदेशी यांना १६४ तर राठोड यांना १२४ मते मिळाली त्यात परदेशी निवडून आले आहेत. इतर कार्यकारणीत सचिव- जीवन पांडे, सहसचिव - चित्रा कापसे- शिंदे तर खजिनदार म्हणून ॲड. कैलास आगे यांचा समावेश आहे. वकील संघाच्या महिला उपाध्यक्षपदी म्हणून ज्योस्यना कदम यांची निवड करण्यात आली आहे. कार्यकारणीत पहिल्यांदाच ज्योस्यना कदम आणि चित्रा कापसे - शिंदे या दोन महिलांना संधी देण्यात आली आहे. मावळते अध्यक्ष अरुण लबडे यांनी या सर्व कार्यकारिणीच्या निवडीची घोषणा केली. नवनिर्वाचित सर्व पदाधिकाऱ्यांचे ॲड. सुनील शेळके, ॲड. सतीश डोंगरे , ॲड.वैजयंता धसाळ, ॲड. पूनम तांबोळी, ॲड. ऋषी शर्मा, ॲड .योगेश शिंदे, ॲड. सचिन वाकडे, ॲड. रमाकांत राठोड, ॲड. प्रमोद आवारी,ॲड. सुजित तांबे आदींनी अभिनंदन केले आहे.

# आनंदी बाजार उपक्रमात विद्यार्थ्यांचा वाढता सहभाग प्रेरणादायी- शेकडे

## कुत्तरवाडी शाळेत आनंदी बाजार उपक्रमाची सांगता

**पाथर्डी । नितीन गटाणी**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पौष्टिक व सकस आहाराचे महत्त्व कळावे, व्यावहारिक ज्ञान मिळावे तसेच दैनंदिन सामाजिक जीवनपद्धतीचे आकलन व्हावे, या उद्देशाने लघुउद्यम महोत्सवांतर्गत राबविण्यात येणाऱ्या आनंदी बाजार उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांचा वाढता सहभाग अत्यंत प्रेरणादायी असल्याचे मत पुणे जिल्हा परिषदेतील प्रशिक्षणार्थी उपशिक्षणाधिकारी प्रसाद शेकडे यांनी व्यक्त केले.

कुत्तरवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व ढाकणे वस्ती यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच पुष्पा मिसाळ होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून वरिष्ठ सहाय्यक देविदास दहिफळे, आनंदा दहिफळे, शांताबाई दहिफळे, दत्तात्रय दहिफळे, यशवंत दहिफळे, भगवान दहिफळे, बाबासाहेब दहिफळे, डॉ. सुभाष शेकडे यांच्यासह ग्रामस्थ, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने




उपस्थित होते.

आनंदी बाजार उपक्रमात विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साही व आनंदी वातावरणात विविध प्रकारच्या पालेभाज्या, फळभाज्या, पेरू, बोरे, पपई, नारळ, आवळे तसेच पाणीपुरी, इडली-सांबार, पॅटीस, वडापाव, भजे, भेळ, भाजलेल्या शेंगा, तुरीच्या शेंगा व विविध रानमेवा विक्रीसाठी आणले होते. आपल्या मुलांचे कौतुक करण्यासाठी पालकांनीही मोठ्या उत्साहाने आनंदी बाजारात सहभाग नोंदविला. हा उपक्रम शिक्षण विस्तार अधिकारी रामनाथ कराड, डायट अधिव्याख्याता मुकुंद दहिफळे व केंद्रप्रमुख गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे संपन्न झाला.

यावेळी ग्रामस्थांशी संवाद साधताना शेकडे म्हणाले की, शालेय जीवनात शारीरिक, बौद्धिक व मानसिक विकासासाठी विद्यार्थ्यांच्या आहाराकडे लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. पालक पैसे खर्च करण्यास तयार असतात; मात्र परिपूर्ण आहार देण्याबाबत उदासीनता दिसून येते. फास्ट फूड, रस्त्यावरील खाद्यपदार्थ व पॅकिंग पदार्थ आरोग्यास अपायकारक ठरतात. सकस व घरचे अन्न सर्वश्रेष्ठ असून विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन पालकांनी घरीच पौष्टिक अन्न तयार करून द्यावे, असे त्यांनी सांगितले.

आनंदी बाजार उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना भाजीपाला व रानभाज्यांची ओळख होते, तसेच खरेदी-विक्रीतून आर्थिक व्यवहारांचे ज्ञान मिळून त्यांचा व्यावसायिक दृष्टिकोन विकसित होतो. यासाठीच शासनाने आनंदी बाजार उपक्रमाला चालना दिल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# साने गुरुजी

आज भारत मातेचे थोर सुपुत्र, स्वातंत्र्य सैनिक, समाजवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, मराठी साहित्यिक साने गुरुजी यांची जयंती. साने गुरुजी यांचे पूर्ण नाव पांडुरंग सदाशिव साने. त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणातील पालगड येथे झाला. त्यांचे वडील सदाशिवराव हे पालगडचे खोत होते. लहानपणापासून साने गुरुजींचे त्यांच्या आईवर खूप प्रेम होते. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा खूप प्रभाव होता. श्यामची आई या पुस्तकात त्यांनी आपल्या आईच्या साऱ्या आठवणी सांगितल्या आहेत. साने गुरुजींच्या आईने त्यांच्या बालमनावर जे संस्कार केले त्यातूनच त्यांचा जीवनविकास झाला. सर्वांवरती प्रेम करा हा धडा त्यांना त्यांच्या आईनेच दिला. साने गुरुजींचे मन अतिशय भावनाप्रधान व संस्कारक्षम होते. म्हणूनच आईने पेरलेल्या सदभावनांची वाढ त्यांच्या ठिकाणी लवकर झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अमळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये काहीकाळ शिक्षक म्हणून नोकरी केली. प्रताप हायस्कूलच्या वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्यातील शिक्षकाला अधिक वाव मिळाला. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वाबलंबनाचे धडे दिले. सेवावृत्ती शिकवली. १९२८ साली त्यांनी विद्यार्थी हे मासिक सुरू केले. त्यानंतर त्यांनी विपुल लेखन केले. कांदबऱ्या, लेख, निबंध, काव्य, चरित्रे, नाट्यसंवाद अशा सर्व साहित्य प्रकारात त्यांची लेखणी अविरत चालली. त्यांच्या साहित्यात करुणा, स्नेह, प्रेम या गोष्टीचा वर्षाव झालेला आहे. त्यांच्या भाषेला एकप्रकारची धार आहे, बोध आहे. त्यांनी अतिशय साध्या आणि सोप्या शब्दात लेखन केल्याने लोकांना ते भावले. नाशिकच्या कारागृहात असताना त्यांनी श्यामची आई ही अजरामर कादंबरी लिहिली. धुळ्याच्या तुरुंगात त्यांनी विनोबा भावेंनी सांगितलेली गीताई लिहिली. साने गुरुजी थोर देशभक्त होते त्यांच्यावर महात्मा गांधींचा मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत. १९३० साली त्यांनी सविनय कायदेभंग आंदोलनात भाग घेतला त्यामुळे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. काँग्रेस नावाचे साप्ताहिक त्यांनी सुरू केले, दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी मिळावी यासाठीही त्यांनी आंदोलन केले होते. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार, राष्ट्र सेवा दलाचे कार्य या माध्यमातून त्यांनी राजकीय कार्य केले. पत्री या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहात त्यांनी अनेक देशभक्तीपर गीते लिहिली. त्यातील बलसागर भारत होवो... या गीताने तरुणांना स्फुरण चढले या गीताने प्रेरित होऊन हजारो तरुण स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. या गीताचा वाढता प्रसार पाहून इंग्रज सरकारने या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त करुन या गीतावर बंदी आणली. साने गुरुजींना अस्पृश्यता, जातीपात, रूढी परंपरा, अंधश्रद्धा याविषयी कमालीची चीड होती. या गोष्टींना त्यांनी नेहमीच विरोध केला. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दलितांनाही प्रवेश मिळावा यासाठी १९४६ साली त्यांनी महाराष्ट्रभर दौरा केला. त्यासाठी त्यांनी उपोषण केले त्यांच्या प्रयत्नांमुळेच पंढरपूरच्या विठ्ठलाचे मंदिर सर्वांसाठी खुले झाले. एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला मुक्त केले असे त्यावेळी म्हटले गेले. स्वातंत्र्य मिळाल्यावर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या माध्यमातून त्यांनी देश जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यातील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असा उद्देश या चळवळीचा होता. त्यांनी स्वतः तामिळ व बंगाली या भाषा शिकल्या होत्या. १९४८ साली त्यांनी साधना हे मासिक सुरू केले. या मासिकांतून ते जनजागृती करू लागले. ११ जून १९५० रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. साने गुरुजींना जयंतीदिनी विनम्र अभिवादन.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

# मानवीहक्क संरक्षणात समाजकार्यकर्त्यांची भूमिका महत्त्वाची- न्या.पैठणकर

## सीएसआरडीत मानवाधिकार विषयावर एकदिवसीय कार्यशाळा



**अहमदनगर । रयत समाचार**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या आजीवन शिक्षण व विस्तार विभाग आणि बीपीएचईएसचे सीएसआरडी समाजकार्य व संधोधन संस्था, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने समकालीन काळातील मानवाधिकार या विषयावर नुकतेच सीएसआरडी सभागृहात एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्यायमूर्ती योगेश पैठणकर, सदस्य ॲड. सुनील मुंदडा, जिल्हा शासकीय रुग्णालयाचे आयुष्मान भारत अभियान समन्वयक डॉ. रोहित करांडे, सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यशाळेत एमएसडब्ल्यू प्रथम वर्षाचे विद्यार्थी, सीएसआरडी संस्थेचे प्राध्यापक, तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहिल्यानगरचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले न्यायमूर्ती योगेश पैठणकर यांनी आपल्या मार्गदर्शनात भारतीय संविधानातील कलम २१ म्हणजे सन्मानाने जगण्याचा हक्क हा सर्वांत मूलभूत आणि महत्त्वाचा मानवाधिकार असल्याचे स्पष्ट केले. तसेच समाजातील गरजू व दुर्बल घटकांना न्याय मिळावा यासाठी मोफत व सुलभ कायदेशीर सहाय्य उपलब्ध करून देण्यात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. मानवी हक्क संरक्षणात समाजकार्यकर्त्यांची भूमिका महत्त्वाची असून त्यादृष्टीने त्यांना विशेष प्रशिक्षण आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. अध्यक्षीय मार्गदर्शनात संचालक डॉ. सुरेश पठारे यांनी समाजकार्य व मानवाधिकार यांचा अतूट संबंध विशद केला. सध्याच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीत वाढत चाललेली विषमता, भेदभाव आणि मानवाधिकार उल्लंघनाच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर मानवाधिकारांचे महत्त्व अधिकच अधोरेखित झाले. समाजकार्य हे माणुसकीवर आधारित व्यावसायिक क्षेत्र असून, समाजातील वंचित, दुर्बल आणि उपेक्षित घटकांचे मूलभूत हक्क जपण्याची जबाबदारी समाजकार्यकर्त्यांवर आहे. या दृष्टीने अशा कार्यशाळामहत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी नमूद केले.तसेच सीएसआरडी व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने लवकरच कायदेविषयक सल्ला केंद्र सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा केली. यावेळी ॲड. सुनील मुंदडा यांनी मानवाधिकारांचा ऐतिहासिक प्रवास, भारतीय संविधानातील मूलभूत हक्क व कर्तव्ये आणि त्यांचे आजच्या लोकशाही व्यवस्थेतील महत्त्व यावर सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. रोहित करांडे यांनी महात्मा फुले जन आरोग्य योजना व इतर आरोग्य विमा योजनांच्या माध्यमातून आरोग्य हक्क कसे सुरक्षित होतात यावर प्रकाश टाकत, सामाजिक कार्यकर्त्यांनी जनजागृतीसाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन केले. नंतरच्या सत्रात मानवाधिकार संरक्षणासाठी कृती आराखडा याबाबत विद्यार्थ्यांनी पोस्टर सादरीकरणाद्वारे आपले विचार मांडले. ही कार्यशाळा मानवाधिकारांवरील चिंतन, संवाद आणि कृती आराखडे यासाठी प्रभावी व्यासपीठ ठरली असून, सामाजिक न्याय व मानवी सन्मानाबाबत विद्यार्थ्यांची जाणीव अधिक दृढ करण्यात महत्त्वपूर्ण ठरली असा अभिप्राय विद्यार्थ्यांनी दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यशाळा समन्वयक डॉ. प्रदीप जारे यांनी केले तर आभार डॉ. सुरेश मुगुटमल यांनी मानले, सूत्रसंचालन सॅम्युअल वाघमारे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सीएसआरडी महाविद्यालयाचे कर्मचारी व विदयार्थी यांनी परिश्रम घेतले.



# तुम जलन बरकरार ठेवा, आम्ही जलवा बरकरार ठेवू- विवेक कोल्हे

**कोपरगाव । किसन पवार**

नगरपरिषदेची निवडणूक नाट्यमय घडामोडींमुळे चांगलीच गाजली. निवडणुकीच्या आदल्या दिवशी एका ठिकाणी उमेदवारी जाहीर असणाऱ्यांनी रातोरात दुसऱ्या पक्षात प्रवेश केल्याने राजकीय वातावरण तापले होते. मात्र नैतिकतेला तिलांजली देत केवळ राजकीय स्वार्थासाठी केलेले हे प्रयोग जनतेने सपशेल फेटाळून लावले. त्याचा स्पष्ट प्रत्यय निवडणूक निकालातून आला असून भारतीय जनता पार्टी व लोकसेवा आघाडी (मित्रपक्ष) यांना घवघवीत यश मिळाले. या विजयानंतर सर्व प्रभागांतील विजयी उमेदवारांच्या उपस्थितीत आयोजित पत्रकार परिषदेत माजी आमदार स्नेहलता कोल्हे, विवेक कोल्हे, नवनिर्वाचित नगराध्यक्ष पराग संधान तसेच निर्णय प्रक्रियेतील सदस्य व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना विवेक कोल्हे म्हणाले की, ''विरोधकांना निवडणुकीचा सूर शेवटपर्यंत सापडला नाही. माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे हयात नसताना त्यांच्यावर वैयक्तिक टीका करण्यात आली. त्यानंतर आम्ही चौकटीत राहूनच प्रतिउत्तर दिले, जे स्वाभाविक होते. निवडणूक संपली की राजकारण संपले, या भावनेतून आता आम्ही विकासकामांना सुरुवात केली आहे.'' निवडणूक काळात आम्हाला रोखण्यासाठी अनेकांनी एकत्र येऊन प्रयत्न केले. विरोधकांनी खालच्या पातळीवर जाऊन टीका केली. याआधी सत्तेत असतानाही त्यांनी केलेल्या गैरप्रकारांमुळे जनता आमच्या बाजूने ठाम उभी राहिली, हे लक्षात आल्यानंतर विरोधकांनी प्रचाराची पातळी सोडली, हे सर्वश्रुत आहे. मात्र जनतेने अशा खालच्या पातळीवरील राजकारणाला स्पष्टपणे नकार दिला, असेही त्यांनी सांगितले. विरोधकांना प्रत्युत्तर देताना विवेक कोल्हे म्हणाले, ''तुम जलन बरकरार ठेवा, आम्ही जलवा बरकरार ठेवू.'' कोपरगाव नगरीच्या जनतेने ऐतिहासिक कौल दिला असून ज्या गटाचे नगरसेवक, त्याच गटाचा नगराध्यक्ष निवडला जाण्याची घटना प्रथमच इतक्या मोठ्या संख्येने घडली आहे.

# सन फार्मा ते हॉटेल सावली रस्त्याचे काम दर्जाहीन

**नगर तालुका । प्रतिनिधी**

सन फार्मा कंपनी ते हॉटेल सावली या महत्त्वाच्या रस्त्याच्या कामाकडे संबंधित अधिकारी व ठेकेदार कंपनीकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप माजी पंचायत समिती उपसभापती डॉ. दिलीप पवार यांनी केला आहे. काल ता. २३ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी पंकज आशिया यांना याविषयी निवेदन देण्यात आले. तब्बल चार ते पाच वर्षांच्या प्रतीक्षेनंतर या रस्त्याचे काम सुरू झाले.

सुरुवातीच्या काळात कामाचा दर्जा समाधानकारक होता; मात्र गेल्या काही दिवसांपासून ठेकेदाराची मनमानी सुरू असून अवघ्या दोन मिनिटांच्या अंतरावर अधिकाऱ्यांची कार्यालये असतानाही कामाच्या गुणवत्तेकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. सध्या या रस्त्यावर दुभाजक टाकण्याचे काम सुरू आहे. नियमाप्रमाणे दुभाजकात माती भरून त्यावर योग्य प्रक्रिया करणे अपेक्षित असताना, वारंवार सूचना देऊनही दुभाजकाला पाणी मारण्यात हलगर्जीपणा केला जात आहे. तसेच मातीऐवजी मोठ्या प्रमाणात रस्त्याचा




खोदलेला डांबरी माल खाली टाकण्यात येत असून वरवर केवळ जुजबी मातीचा थर दिला जात आहे. यामुळे रस्त्याच्या मजबुतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. या बाबत संबंधित अधिकारी संदीप बडगे व श्री. बळी यांच्याकडे वारंवार तक्रारी करूनही केवळ वेळ मारून नेण्याचे काम केले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. हा रस्ता पुढील अनेक वर्षे पुन्हा होणार नसल्याने सध्या तरी कामाचा दर्जा काटेकोरपणे राखला गेला पाहिजे, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. या कामात तात्काळ सुधारणा करून दर्जेदार काम करण्यात न आल्यास शुक्रवार, ता. २६ रोजी कार्यालयात आंदोलन करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा डॉ. दिलीप पवार यांनी दिला आहे.

# गणित जीवनाशी घट्ट जोडलेले - प्रा.डॉ. गायकवाड

## जनता महाविद्यालयात राष्ट्रीय गणितदिन उत्साहात साजरा



**नगर तालुका । संजय ठोंबरे**

विश्वप्रसिद्ध गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त ता. २२ डिसेंबर रोजी देशभरात राष्ट्रीय गणित दिन साजरा करण्यात येतो. याच अनुषंगाने अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या रुईछत्तिसी येथील जनता कला व विज्ञान महाविद्यालयात गणित विभागाच्या वतीने राष्ट्रीय गणित दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी गणित प्रदर्शन तसेच व्याख्यानाचे आयोजन केले होते.

प्रमुख व्याख्याते म्हणून अहिल्यानगर येथील न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे गणित विभागप्रमुख प्रा.डॉ. एस.बी. गायकवाड उपस्थित होते तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोहर करांडे होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. डी.एस. तळुले, विज्ञान विभागप्रमुख प्रा. रविराज सुपेकर तसेच कार्यक्रम संयोजिका प्रा. शुभांगी गायकवाड मंचावर उपस्थित होत्या. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते गणिततज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रा.डॉ. एस.बी. गायकवाड यांच्या हस्ते

### गणित प्रदर्शन, व्याख्यान व विद्यार्थ्यांचा गौरव

पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेत महाविद्यालय स्तरावर अंजली मच्छिंद्र पठारे हिने प्रथम, माया तुकाराम गोरे हिने द्वितीय तर संध्या सतीश भस्मे हिने तृतीय क्रमांक पटकावला. तसेच जनता विद्यालय गटातून अनुजा निलेश वाघ (७ वी) प्रथम, तनुजा कांतिलाल सायंबर (११ वी) द्वितीय आणि सोनाक्षी सर्जेराव बोरकर (६ वी) तृतीय क्रमांकाच्या मानकरी ठरल्या. विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

प्रमुख पाहुणे व वक्ते प्रा.डॉ. एस.बी. गायकवाड यांनी आपल्या व्याख्यानातून गणिताची संकल्पना सुलभ व रोचक पद्धतीने उलगडून सांगितली. ''गणित म्हणजे केवळ अवघड संकल्पना नसून, निसर्गनियमांप्रमाणे आपण जे पेरतो त्याचे अनेकपटीने फळ मिळते. त्यामुळे गणित जीवनाशी घट्ट जोडलेले आहे,'' असे त्यांनी नमूद केले. तसेच श्रीनिवास रामानुजन यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंगांचा आढावा घेत विद्यार्थ्यांना गणिताची गोडी निर्माण करण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. मनोहर करांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना दैनंदिन जीवनातील गणिताचे महत्त्व स्पष्ट केले. यावेळी जनता कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी आपले प्रकल्प सादर केले. गणित विषयाचे प्रा. धीरज धामने यांचीही उपस्थिती लाभली. कार्यक्रमास प्रा. संदीप भणगे, डॉ. अनिल कोलते, प्रा. डी.बी. वाळके, प्रा. किरण पाटोळे, प्रा. मोहन पोटरे, प्रा. शंकर बोरुडे, प्रा. सुहास नवले, प्रा. एन.एस. सय्यद, प्रा. एस.ए. कोलते, प्रा. केशव निक्रड, प्रा. आर. आर. साळवे, प्रा. व्ही.बी. खामकर, प्रा. ए.एस. धनवट, प्रा. सरला कोलते, प्रा. सुभदा जोशी, प्रा. वैशाली पवार, प्रा. गौरी विनायक गायकवाड, प्रा. सुप्रिया टकले, प्रा. राजेंद्र गोरे, निलेश खैरे, निर्मला म्हस्के, मुकुंद हराळ, महेश ठोंबरे आदींसह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी वाटाडे व तृप्ती बोगाड यांनी केले तर आभार प्रा. शुभांगी गायकवाड यांनी मानले.

# प्रजापिता ब्रह्माकुमारीकडून 'विश्व ध्यान दिवस' साजरा



**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय अनगोळ शाखेच्या वतीने रविवारी 'विश्व ध्यान दिवस' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून बेळगाव विभागाच्या संचालिका राजयोगिनी ब्रह्माकुमारी अंबिका उपस्थित होत्या. कार्यक्रमात बोलताना ब्रह्माकुमारी अंबिका म्हणाल्या की, संयुक्त राष्ट्र संघाने २१ डिसेंबर हा 'विश्व ध्यान दिवस' म्हणून साजरा करण्याची घोषणा केली असून संपूर्ण जगात ध्यान व ज्ञानाचे महत्त्व समजून घेणे, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. या कार्यक्रमास निवृत्त न्यायाधीश ए. एस. पाश्चापूरे हेही उपस्थित होते. ते म्हणाले की, जीवनात स्वतःच्या मनावर नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे असून ध्यानाच्या माध्यमातून मनावर नियंत्रण ठेवणे शक्य आहे. अखिल भारतीय ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष-उपाध्यक्ष महांतेश हिरेमठ यांनी ध्यानधारणेमुळे आपल्या जीवनात आरोग्यदायी बदल घडून आल्याचे सांगितले. तसेच 'हॅपी थॉट्स'च्या समन्वयिका छाया शिंदे यांनी मुलांमध्ये मोबाईलचा वाढता वापर चिंताजनक असल्याचे नमूद केले. कार्यक्रमास सुलोचना, महादेवी, मीनाक्षी बहेन, अंबरशेठ, दीपक, मनोहर, दत्तात्रय आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनगोळ शाखेच्या संचालिका ब्रह्माकुमारी विद्या यांनी केले.



# राजकीय सुडापोटी मुथा यांच्यावर खोटे गुन्हे- चित्ते

## गुन्हे मागे न घेतल्यास उग्र आंदोलन

**बेलापूर । शफीक बागवान**

राजकीय सुडापोटी सुनील मुथा यांच्यावरील दाखल केलेले गुन्हे विनाविलंब मागे घ्यावेत, अन्यथा यापुढे तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडू, असा गर्भित इशारा शिवसेनेचे नेते प्रकाश चित्ते यांनी दिला. सर्वपक्षीय, सर्व धर्मीयांच्या वतीने अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांना सामूहिक मोर्चाने जाऊन निवेदन देण्यात आले. त्यावेळी चित्ते बोलत होते. ते म्हणाले, बॉम्ब शोधण्याच्या बहाण्याने गेलेल्या पोलीस प्रशासनाने मुथा यांच्या मॉल मध्ये उपलब्ध वाहनांचे नंबर्स घेतले. यानंतर एका राजकीय नेत्याच्या कार्यालयातून खाजगी सचिवाकडून पोलीस प्रशासनावर दबाव टाकून मुथा यांच्यावर गुन्हे दाखल करण्यासंदर्भात भ्रमणध्वनी करण्यात आले. मुथा केवळ आपल्या बरोबर राहतात म्हणून त्यांच्यावर हे षडयंत्र रचण्यात आले असून दाखल केलेले गुन्हे सरकारने विना विलंब मागे घ्यावेत, तसे न झाल्यास भविष्यात उग्र स्वरूपाचे आंदोलन उभारण्याचा इशारा चित्ते यांनी यावेळी दिला. अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांनी यावेळी निवेदन स्वीकारले. छोटेखानी मोर्चामध्ये प्रकाश चित्तेसह, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, व्यापारी असोसिएशनचे गौतम उपाध्ये, रमेश लोढा, महेश व्यास, किरण लुनिया, मनसुख चोरडिया, राजेंद्र सोनवणे, संजय पांडे, रमेश कोठारी, मल्लू शिंदे, भरत साळुंखे, प्रशांत लड्डा, रमण मुथा, बबन मुठे , सतीश चोरडिया, अभय मुथा,संजय कासलीवाल, सुरेश बाठीया, डॉ.अमोल बाठीया, दीपक संघवी यांच्यासह मर्चंट असोसिएशनचे सर्व संचालक, बेलापूर गावातील शेकडो ग्रामस्थ तसेच शिवसेनेचे असंख्य कार्यकर्ते मोर्चात सहभागी झाले होते.